सामना — अवती भवती — पुणे, सोमवार, दि. २१ मार्च

# चिकित्सा पद्धतीचे मूळ हिंदुस्थानी ग्रंथांत



डॉ. अमरसिंह निकम यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून शेलारमामा, उल्हास पवार, डॉ. एस. एफ. पाटील, डॉ. निकम आणि अनिल डिग्गीकर.

पिंपरी, दि. २० (प्रतिनिधी) - आयुर्वेदासारख्या सर्वचिकित्सा पद्धतीचे मूळ हिंदुस्थानी पुरातन ग्रंथांमध्ये आणि संस्कृतीमध्ये दडलेले आहे. आपल्या वैभवशाली पुरातन ग्रंथांचा अनमोल ठेवा येणाऱ्या पिढीने जतन करावा, असे आवाहन उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार उल्हास पवार यांनी केले.

पिंपरीगावातील प्रसिद्ध होमिओपॅथिक डॉ. अमरसिंह निकमलिखित 'होमिओपॅथिक : द आर्ट .रॅपीड ॲण्ड जैंटलहिलिंग' या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीच्या प्रकाशनसोहळ्यात ते बोलत होते. संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात या पुस्तक प्रकाशनसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारती विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एस. एफ. पाटील यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. महापौर मंगला कदम, स्वातंत्र्यसैनिक हभप शेलारमामा, राज्याचे क्रीडासंचालक अनिल डिग्गीकर, लेखिका डॉ. दीप्ती गुप्ता, हिंदी आंदोलनाचे अध्यक्ष संजय भारद्वार, कवी शैलेंद्र शुक्ला, दिलीप ठाणेकर, माजी आमदार गजानन बाबर, श्रीधर माडगुळकर याप्रसंगी उपस्थित होते.

पवार म्हणाले, या उपचारपद्धतीचे दुष्परिणाम होत नसल्याने तसेच आजार पूर्णत: नाहीसा होत असल्याने नागरिकांचा होमिओपॅथी व आयुर्वेदिक उपचार घेण्याकडे कल वाढला आहे. या सर्वचिकित्सा पद्धतीचे मूळ हिंदुस्थानी ग्रंथांत आहे. मात्र, परदेशातून येईल तेच चांगले, अशी आपली समजूत झाल्याने स्वत:च्या कोणत्याच गोष्टीवर आपला विश्वास बसत नाही हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल. तसेच आपल्याकडील ज्ञान आपण दुसऱ्याला सांगत नाही. मात्र, डॉ. निकम यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून होमिओपॅथीचे ज्ञान इतरांपुढे आणले आहे. त्यांचे हे कार्य निश्चितच अभिनंदनीय आहे.

यावेळी होमिओपॅथिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना 'डॉ. द. वि. निकम स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. ज्ञानप्रकाश द्विवेदी यांनी सूत्रसंचालन केले. सुधा निकम तसेच आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड हिलिंग सेंटरमधील डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.